**अतारांकित प्रश्नोत्तरांची ७ वी यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२५**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मौजै बहिरवली ते करंबवणे (जि. रत्नागिरी ) येथील खाडीपुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१) १९२ (२८-०४-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बहिरवली ते करंबवणे (जि.रत्नागिरी) येथील बांधण्यात येणाऱ्या खाडीपुलाच्या कामासाठी सन २०१७-१८ मध्ये मंजुरी मिळून विविध विभागांकडून आवश्यक परवानग्या मिळविण्यासाठी खासगी तज्ञ सल्लागाराच्या नेमणुकीची निविदा प्रक्रिया दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान पूर्ण होवून कार्यारंभ आदेश देऊन दोन वर्षाचा कालावधी होऊनही संबंधित सल्लागाराकडून आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामासाठी शासनाने नेमण्यात आलेल्या खाजगी तज्ञ सल्लागार कंपनीचे नाव काय असून आतापर्यंत पुलाच्या आवश्यकतेसाठी असलेल्या किती परवानग्या प्राप्त करण्यात आल्या असून त्यासाठी अंदाजित किती खर्च करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाजगी तज्ञ सल्लागार कंपनीवर कोणती कार्यवाही केली तसेच पुलाचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्यादृष्टिने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०६-०६-२०२५) :** (१) हे खरे आहे.

विषयांकित परवानगी विषयक काम प्रगतीत आहे.

(२) विषयांकित कामाकरिता आवश्यक परवानग्या प्राप्त करण्याकरिता तज्ञ सल्लागार मे. इनव्हारो कन्सलटंट यांना दिनांक ६/२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कार्यारंभ आदेश दिलेले आहेत. परवानग्या प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही प्रगतीत असून यावर अद्याप पर्यंत अंदाजे रु.२२.०० लाख इतका खर्च झालेला आहे.

(३) उक्त संस्थेने कार्यवाही शीघ्रतेने पूर्ण करावी या दृष्टीकोनातुन त्यांना प्रत्यक्ष सूचना विभागामार्फत देण्यात आलेल्या आहेत.

(४) वन विभागाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने वन विभागास तांत्रिकदृष्टया सोयीचे पर्यायी क्षेत्र उपलब्ध न होणे, बदललेले नियम, गेल्या वर्षातील दोन निवडणुकांकरिता बहुतांश कर्मचारी वर्ग हा निवडणुक कामात व्यस्त असणे, इत्यादी बाबींमुळे विलंब होत आहे.

---

**मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील बहादूरशेख नाका (चिपळूण) येथील उड्डाणपुलाचा भाग कोसळल्याबाबत**

**(२) २९१ (२८-०४-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील चिपळूणमधील बहादूरशेख नाका या ठिकाणी काम सुरू असलेल्या उड्डानपुलाला तडे जावून पुलाचा काही भाग क्रेनसह कोसळल्याचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबतचे आश्वासन तत्कालिन मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्यासह कोसळलेल्या पुलासह संपूर्ण महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१८-०६-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे.

दिनांक १६.१०.२०२३ रोजी चिपळूण शहरातील मुंबई-गोवा महामार्गावरील बहादूर शेख नाका येथे सुरु असलेल्या उड्डाणपुलाचा गर्डर लॉचिंग करताना स्पाईन प्रीकास्ट क्रॉक्रिटचा भाग कोसळला. तद्नंतर त्याअनुषंगाने दिनांक १८.१०.२०२३ च्या आदेशान्वये (मुख्य अभियंता, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र आणि गोवा, नवी-मुंबई) तज्ञ समिती गठीत करण्यात आली होती. कोसळलेल्या पुलासह संपूर्ण महामार्गाचे काम जानेवारी २०२६ पर्यत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) नियुक्त कंत्राटदार नवीन संरचनेनुसार उड्डाणपूलाचे संपूर्ण काम स्वखर्चाने करत आहे. तसेच उड्डाणपूलासाठी जुन्या डिझाइनप्रमाणे कास्ट केलेले स्पाईन सेगमेंट आणि विंग्स हे स्वखर्चाने तोडण्यात आले आहे. वरिष्ठ कार्यालयाकडून विहीत NHAI Policy Guidelines/२०२१ Policy Circular No. १८.६३/२०२१ वा. दिनांक ०८.०१.२०२१ नुसार कंत्राटदारास (Concessionaire) ५० लक्ष व स्वतंत्र अभियंतास (IE) २० लक्ष दंड आकारण्यात आला असून मानकाप्रमाणे लेखी नोटीस देण्यात आली आहे. सदयास्थितीत नवीन डिझाइन नुसार उड्डाणपूलाचे काम प्रगतीत असून काम ५९.००% पुर्ण झाले आहे. उड्डाणपुलासह संपूर्ण महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम डिसेंबर २०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

## जिल्हा परिषदेप्रमाणे (जि. अमरावती) महानगरपालिकेच्या शिक्षण विभागासाठी जिल्हा नियोजन समितीमधून स्वतंत्र निधी देण्याबाबत

**(३) ३२१ (२५-०४-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषदेप्रमाणे (जि. अमरावती) महानगरपालिकेच्या शिक्षण विभागासाठी जिल्हा नियोजन समितीमधून स्वतंत्र निधी देऊन स्वतंत्र शिर्ष तयार करण्याबाबत माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लोकप्रतिनिधींनी अमरावती जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती महानगरपालिकेच्या ६३ शाळा असून त्यांच्या इमारतींची दुरुस्ती करुन शाळांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे, खाजगी शाळांशी स्पर्धा करणे यासाठी लोकप्रतिनिधींनी निधीची गरज असल्याचे बैठकीत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात ज्याप्रमाणे जिल्हा नियोजन समिती म्हणून स्वतंत्र शिर्षकाखाली निधी मिळतो त्याच धर्तीवर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागासाठी स्वतंत्र शिर्ष तयार करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (१३-०६-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत अमरावती महानगरपालिकेच्या शिक्षण विभागासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष घेण्याची कार्यवाही नगर विकास विभागाकडून करण्यासाठी आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांच्याकडून

दिनांक ३१/०१/२०२५ च्या पत्रान्वये नगर विकास विभागास विनंती करण्यात आली आहे.

---

## भोस्ते (ता. खेड, जि. रत्नागिरी) घाटातील धोकादायक वळण काढून टाकण्याबाबत

**(४) ३३९ (२८-०४-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरण कामामध्ये भोस्ते (ता. खेड, जि. रत्नागिरी) घाटातील वळण हे आधीपेक्षा अधिक धोकादायक झाले असून आतापर्यंत २५० हून अधिक अपघात या वळणावर झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वळणावर २०० मीटर अंतरावर तब्बल २० गतिरोधक टाकण्यात आले असूनही अपघाताचे प्रमाण कमी झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामार्गाची पाहणी सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिनांक ३० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास तसेच त्यानंतर वारंवार केली असूनही सदर धोकादायक वळण काढून टाकण्याबाबत किंवा वळण उताराची तीव्रता कमी करण्याबाबत कोणताही निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धोकादायक वळण काढून टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१७-०६-२०२५) :** (१) अशंत: खरे आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ ची भोस्ते घाटातील लांबी राष्ट्रीय महामार्ग (सार्वनिक बांधकाम)विभागाकडे आहे. भोस्ते घाटामध्ये रस्त्याच्या तीव्र उतारा बरोबर येणाऱ्या तीव्र वळण (hair pin bend) या दोन्ही बाबी एकत्रित आल्याने सदर ठिकाणी मोठया वाहनांच्या (Heavy Multiaxial Vehicle) अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत. सदर ठिकाणी मोठया वाहनांना वेग नियंत्रित न करता आल्याने मोठया वाहनांच्या अपघातांच्या घटना घडलेल्या आहेत. पोलीस प्रशासनाकडून उपलब्ध माहितीनुसार सदर ठिकाणी मागील ०६ वर्षांमध्ये १९अपघात झालेले आहेत.

(२) अशंत: खरे आहे.

भोस्ते घाटामध्ये वळण मार्गाच्या ठिकाणी में. इंडीया इन्फ्राटेक या सुरक्षा तांत्रिक सल्लागारा मार्फत सेफ्टी ऑडिट करण्यात आले आहे व त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार संबंधीत ठेकेदार मे. कशेडी परशुराम हायवे प्रा. लि. यांचे मार्फत स्पीड ब्रेकर लावणे, दिशा दर्शक बोर्ड लावणे, स्पीड लीमीट बोर्ड लावणे, कॅट आईज लावणे, सूचना दर्शक बोर्ड लावणे इत्यादी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. भोस्ते घाटामध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहनांचा वेग कमी करण्यासाठी १५ गतिरोधक टाकण्यात आले आहेत. पोलीस प्रशासनाकडून प्राप्त अपघातांची आकडेवारी तपासली असता गतिरोधक टाकण्यात आल्यापासून अपघातांचे प्रमाण कमी झाल्याचे अढळून आले आहे.

(३) व (४) महामार्गाची पाहणी सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिनांक ३० मे, २०२३ रोजी केल्यावर धोकादायक वळणाचे विस्तारीकरण व उताराची तीव्रता कमी करण्यासाठी स्वतंत्र अभियंता मे. ब्लुम कंपनी व में. थॉट कंन्स्लटंसी मार्फत तांत्रिक परिक्षण करण्यात येऊन त्यांचे मार्फत भोस्ते घाट वळण सुधारण्यासाठी (मार्गिकेची रुंदी वाढविणेचा) डी. पी. आर. बनवण्यात आला असून त्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार अंदाजपत्रक तयार करुन ते मंजूरीसाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांचे कार्यालयाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहे. सदर मंजूरी प्राप्त झाल्यानंतर या कामाची निविदा अंतिम करुन भोस्ते घाट वळण सुधारणेचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

### राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात आदिवासींची राखीव पदे कमी असल्याबाबत

**(५) ५६४ (३०-०४-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात आदिवासांची राखीव असलेली २९ पदे गायब असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गट १ अ ते १ ड संवर्गातीत एकूण १४१८१ पदापैकी अनुसूचित जमातीसाठी १ हजार ६० पदे राखीव असून अनुसूचित जमातींची भरलेली पदे ८५८ असून २०२ पदांचा पूर्वीचा अनुशेष शिल्ल्क आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जातवैधता प्रमाणपत्र सादर करणाऱ्यांची संख्या ७४८ असून ११० जणांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची संख्या १०९ आहे, त्यामुळे ती पदे रिक्त दाखवणे आवश्यक असताना केवळ ८० पदे रिक्त दाखविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार राखीव पदांचा अनुशेष भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०९-०६-२०२५) :** (१), (२), (३) व (४) नाही.

९६ कर्मचारी अधिसंख्य पदावर कार्यरत आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

### जिंतूर-येलदरी (जि.परभणी) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(६) ५८९ (२८-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर-येलदरी (जि.परभणी) तालुक्यातील मराठवाडा-विदर्भाला जोडणा-या आणि महत्वाच्या रस्त्यांपैकी एक रस्ता असलेल्या रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यावरुन प्रवास करणा-या वाहनचालकासह प्रवाश्यांना नाहक त्रास सहन करावा लागत असून अपघाताचे प्रमाणही वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून तसेच रस्त्याची पाहणी करुन तातडीने रस्त्याची दुरुस्ती करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०३-०७-२०२५) :** (१) व (२) सदर रस्त्यावर गतवर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्त्याचा काही भाग क्षतिग्रस्त झाला होता. वार्षिक देखभाल दुरुस्ती कार्यक्रमातंर्गत रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता वाहतूकीस सुरळीत ठेवण्यात आला आहे.

(३) रस्त्याची कायमस्वरुपी सुधारणा करण्याच्या दृष्टीने निधी, निकष व प्राथम्य क्रमानुसार रस्त्याचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

**पूर्णा शहरातील (जि.परभणी) टी-पॉइंट ते झिरो फाटाकडे जाणाऱ्या सिमेंट रस्त्याचे व नाल्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(७) ५९४ (२८-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्णा शहरातील (जि.परभणी) टी-पॉइंट ते झिरो फाटाकडे जाणाऱ्या सिमेंट रस्त्याचे व रस्तालगत असलेल्या नाल्याचे काम दिवाळीपूर्वी पासून प्रलबिंत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याच्या प्रलबिंत कामामुळे वाहनचालकांना व प्रवाशांना मोठा अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे आतापर्यंत झालेले कामही निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने याबाबत चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांनी संबंधित विभागाकडे माहे, डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर रस्त्याचे व रस्ता लगत असलेल्या नाल्याचे प्रलंबित काम तातडीने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२०-०६-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) निवेदन प्राप्त नाही.

(४) सदर रस्त्यालगतच्या नालीचे काम करतांना रेल्वे पूलाखाली पावसाळयात पाणी साठून राहत असल्याने काम संथगतीने सुरु होते.

सद्यस्थितीत सदर सिमेंट रस्त्याचे व नालीचे काम पूर्ण झाले असून रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

**परभणी शहरातील मध्य भागातून जाणा-या वसमत रोड या महामार्गावर सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(८) ५९८ (२८-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील मध्य भागातून जाणा-या व मोठी वर्दळ असलेल्या वसमत रोड या महामार्गावर कुठेही सिंग्नल, झेब्रा क्रॉसिंग, रम्बलरची व्यवस्था नसल्याने रस्ता ओलांडणा-या नागरीकांना जीव मुठीत धरुन रस्ता ओलांडावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गावर रस्ता ओलांडण्यासाठी आवश्यक सुविधा नसल्यामुळे मागील काही दिवसात अपघातांची संख्या वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील वाहतूक सुरळीत व्हावी तसेच रस्ता ओलांडण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात अशी मागणी नागरीकांनी वाहतूक विभाग व महानगरपालिका प्रशासनाकडे वारंवार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ७ (6)

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१७-०६-२०२५) :** (१) होय,

हे अंशत: खरे आहे. कल्याण-मुरबाड-अहिल्यानगर-नांदेड-परभणी-नांदेड-तेलंगणा हद्द हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६१ असून सदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यक्षेत्रात येत असून या रस्त्यावर 'one time improvement' अंतर्गत रु.२२ कोटीचे काम प्रगतीपथावर आहे. या कामात रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने थर्मोप्लास्ट पेंटिंगचा समावेश करण्यात आलेला आहे. ज्यामुळे रस्ता मार्किंग, रंबलर स्ट्रीप इ. बाबी करणे समाविष्ट आहे. डांबराचे काम पूर्ण होताच थर्मोप्लास्ट पेंटिंग चे काम सुरु करण्यात येईल. तसेच या रस्त्यावर ट्राफिक सिग्नल बसविण्याचा प्रस्ताव महापालिकेमार्फत वार्षिक योजना सन २०२५-२०२६ मध्ये प्रस्तावित केल्याचे महापालिकेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही,

रस्ता ओलांडण्यासाठी सुविधा नसल्यामुळे अपघात वाढले बाबत कोणतीही नोंद या कार्यालयाकडे नाही अथवा पोलीस विभागामार्फत अशी कोणतीही माहिती या विभागास प्राप्त नाही.

(३) हे खरे नाही,

रस्ता ओलांडण्यासंबंधी सुविधा पुरविणे व वाहतूक सुरळीत करणे संबंधी कोणतेही निवेदन प्राप्त नसलेबाबत परिवहन विभागाचा अहवाल प्राप्त झालेला आहे. तसेच सदर बाब लागू नसलेबाबत महापालिका विभागाने अहवाल दिला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही. .

(५) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

## परभणी जिल्ह्यातील जिंतूर-औंढा या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(९) ६१० (२८-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील जिंतूर-औंढा या रस्त्याचे काम सुरु असून या रस्त्याच्या साइडपट्‌यांचे काम करतांना पक्क्या मुरुमाऐवजी बांधावरील माती गाळाचा वापर करुन साइडपट्‌याही अरुंद करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी निकृष्ट दर्जाच्या काम करण्याऱ्या संबंधित ठेकेदारावर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१३-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही,

कोपरगांव-छत्रपती-संभाजीनगर-मंठा-जिंतूर-औंढा-बसमत-तामसा-धानोडा राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२-I हा राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.) विभागाकडे आहे. या भागामध्ये EPC तत्वावरील ४८ कि.मी. लांबीचे (कि.मी. २५८/३०० ते ३०६/३००) काम प्रगतीत असून त्यापैकी २० कमी. लांबी ही परभणी जिल्हयातील आहे. एकूण ४८ कि.मी. लांबीपैकी ४६.८५९ कि.मी. रस्त्याचे काम व दोन्ही बाजूच्या एक मीटर साईड पट्टयाचे काम हे पक्के मुरुमाचे वापर करुन करण्यात आले आहे.

(२) मानकाप्रमाणे MoRTH यांचे व केंद्र शासनाने सल्लागार म्हणून नियुक्ती केलेल्या (M/s Technocrats Advisory in association with Jagdambike Infrasolution Pvt Ltd. Delhi) या कंपनीच्या देखरेखेखाली पूर्ण करण्यात आले आहे. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या साईडपट्टयाचे कामामध्ये वापरात येणाऱ्या मुरुमाच्या नियमीत तपासण्या झालेल्या असून तपासणी निष्कर्ष समाधानकारक आहे.

(३)प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

## जिंतूर-जालना राज्य मार्गावर चारठाण गावा जवळ तसेच पिंपरी (गिते) गावाजवळील पुलाची झालेली दुरवस्था

**(१०) ६१२ (२८-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील जिंतूर-जालना राज्य मार्गवरील चारठाण गावा जवळील नदीवरील मोठा पुल व पिंपरी (गित) गावाजवळील पुलाची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही पुलांवर खड्डे पडले असून पुलाच्या दोन्ही बाजूनी कठडे नसल्याने अनेक वेळा वाहनांचा अपघात होऊन अनेकांना आपला जीव गमवावा लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास दोन्ही पुलांची रुंदी वाढवून पुलांची नव्याने निर्मिती करण्याची वाहचालक व ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे वारंवार केली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१६-०६-२०२५) :** (१) अंशतः खरे आहे.

जिंतूर ते जालना हा राष्ट्रीय महामार्ग ७५२ आय असा आहे. चारठाणा ते जिंतूर लांबीत एकूण ३ छोटे पूल असून कोणताही मोठा पूल नाही. तसेच राष्ट्रीय महामार्गावरील पिंपरी खु (पिंपरी गिते) गावाजवळ साखळी क्र. २७/७१० कि.मी. वरील पुलाची दुरावस्था झालेली आहे.

(२) अंशतः खरे आहे.

सहायक पोलिस निरिक्षक चारठाणा यांच्या अहवालानुसार पिंपरी खु (पिंपरी गिते) गावाजवळील पूलावर अतिवेग, वाहनचाकाचा निष्काळजीपणा इ. बाबीमुळे प्रामुख्याने अपघात झाल्याचे आढळून आले आहे.

(३) राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे सदर राष्ट्रीय महामार्गाची रुंदी वाढविण्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) चारठाणा ते जिंतूर लांबीमध्ये सद्यस्थितीत Short Term Maintenance Contract अंतर्गत दुरुस्तीचे काम मंजूर असून सदर कामात रस्त्यावरील व पुलावरील खड्डे भरणे, पुलाची दुरुस्ती व पुलाला कठडे बसविण्याची कामे अंतर्भूत आहेत. तसेच पुलावर कठडे बसविण्याचे काम पूर्ण होईपर्यंत, पुलावर तात्पुरत्या स्वरूपात सुरक्षित्तेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत काम प्रगतीत आहे.

यासोबतच चारठाणा ते जिंतूर या लांबीत रस्ता (पुलासह) रुंदीकरण व दर्जोन्नतीचे काम मंजुरीकरिता प्रस्तावित आहे. केंद्र शासनामार्फत मंजुरी प्राप्त होताच रस्ता दर्जोन्नतीसह नवीन पुलाचे बांधकाम करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

## राज्यातील बीओटी तत्वावर बांधण्यात आलेल्या रस्ते मार्गावर केंद्र शासनाने टोल बंदी घातलेली असतांनाही टोल वसुली होत असल्याबाबत

**(११) ९३३ (२८-०४-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बीओटी तत्त्वावर बांधण्यात आलेल्या रस्ते मार्गावर केंद्र शासनाने टोल बंदी घातलेली असतांनाही सदरहू मार्गांवर टोल वसुली करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यारम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'बांधा, वापरा, हस्तांतरित करा' (बीओटी) तत्त्वानुसार बांधण्यात आलेल्या रस्ते मार्गांवर कायमस्वरुपी टोल वसूल करता येत नाही, असे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने बीओटी तत्त्वावर बांधलेल्या मार्गाबाबत दाखल याचिकेवर माहे डिसेंबर २०२४, मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीओटी तत्त्वावर बांधण्यात आलेल्या मार्गावर गैरमार्गाने टोलवसुली करणाऱ्या कंपन्यांची चौकशी करून

संबंधित देषींवर कोणती प्रशासकिय/दंडात्मक कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०९-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही. .
(३) प्रश्न उद्भवत नाही. .
(४) प्रश्न उद्भवत नाही. .

---

**खानापूर, आटपाडी, तासगाव (जि. सांगली) तालुक्यातील ग्रामीण मार्ग व इजिमा रस्त्यांना प्रमुख जिल्हा मार्ग करुन दर्जोन्नती करण्याबाबत**

**(१२) १०८७ (२३-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानापूर, आटपाडी, तासगाव (जि. सांगली) तालुक्यातील ग्रामीण मार्ग व इजिमा रस्त्यांना प्रमुख जिल्हा मार्ग करुन दर्जोन्नती करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना पत्रव्यवहार केले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०९-०५-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) रस्त्याच्या दर्जोन्नती करीता शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१४/प्र.क्र.६५/नियोजन-२, दिनांक २०/०७/२०१६ मध्ये नमूद निकषाच्या अधीन राहून आवश्यक कार्यवाही करणेचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही. .

---

**राज्य शासनाने वाहनधारकांना गाडीला फास्ट टॅग बंधनकार केल्याबाबत.**

**(१३) ११९८ (२८-०४-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास वाहनधारकांना फास्ट टॅग बंधनकार केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त फास्ट टॅग हा टोल वसुलीसाठी सुरक्षित आहे काय, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एखादी गाडी घराबाहेर उभी असतानाही केवळ या गाडीचे बनावट नंबर प्लेट वापरून प्रवास करणाऱ्या वाहनाने प्रवास केला तरीही ज्या मालकाची मूळ गाडी आहे त्यांना टोल भरावा लागत असल्याचा प्रकार पुण्यातील पाटस टोल नाक्यावर घडला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सर्व गाड्यांना फास्ट टॅग बंधनकारक करताना असे प्रकार घडू नयेत यासाठी फास्ट टॅग कंपनीकडे आणि शासनाकडे कोणती यंत्रणा असल्यास त्याचे प्रात्यक्षिक सर्वसामान्य वाहनधारकांना दाखवूनच फास्ट टॅग बंधनकारक करण्यात येणार आहे काय, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ७ (9)

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०४-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही. .
(५) प्रश्न उद्भवत नाही. .

---

**नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गाच्या अपूर्णावस्थेत असलेल्या कामाबाबत**

**(१४) १२१० (२८-०४-२०२५). श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गाच्या अपुर्ण असलेल्या कामामुळे एकाच बाजूने वाहतूक सुरु असल्याने दिवसेंदिवस अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महामार्गावर हदगांव जवळील मानवाडी येथे उड्डाणपूल बांधणे आवश्यक असतांनाही त्या ठिकाणी पूल बांधण्यात आलेला नसल्यामुळे त्या ठिकाणी गेल्या काही महिन्यात महामार्गावर अपघात होऊन अनेक प्रवाश्यांना आपला जीव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कारवाई करण्यासह हदगांव जवळील मानवाडी येथे उड्डाणपूल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१२-०६-२०२५) :** (१) नाही, हे खरे नाही.

नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडे आहे. नागपूर ते तुळजापूर राष्ट्रीय महामार्गाच्या मौजे आसोला, Delink पार्ट व Descope पार्ट सोडून काम पूर्ण झालेले आहे. वारंगा ते महागाव भागाचे काम प्रगतीपथावर असून ९६.५०% काम पूर्ण झाले आहे. काम पूर्ण झालेल्या महामार्गावर वाहतूक दोन्ही बाजूने सुरळीत सुरू आहे. मौजे आसोला येथील ६०० मीटर लांबीमध्ये दोन्ही बाजूने ७ मीटर रुंदीचे तात्पुरते सर्विस रोड ठेवण्यात आलेले आहेत. गती मर्यादा इत्यादी फलक लावण्यात आलेले असून कोणत्याही गंभीर अपघाताची नोंद झालेली नाही.
(२) वर नमूद केल्याप्रमाणे वारंगा ते महागांव रा.म.क्र.३६१ चे काम कन्सेशन करारानुसार (Concessions Agreement) प्रगतीपथावर आहे. कन्सेशन कराराच्या (Concessions Agreement) तरतुदीनुसार, मानवाडी फाट्याजवळ चार लेन पेवड शोल्डर (4L+PS) रोडसह ३७० मीटर लांबीचा सर्व्हिस रोड देण्यात आलेला आहे. तसेच मानवाडी फाटा जंक्शन (Junction) साठी मेडियन ओपनींग (Median Opening) सोडण्यात आलेले आहे. तसेच माणवडी फाट्याजवळ महामार्गाच्या दोन्ही बाजूना जास्त वस्ती नाही व माणवडी फाट्याजवळील क्रॉसिंग रस्ता हा SH किंवा NH नाही आणि या रस्त्यावर वाहतूक ५००० PCU पेक्षा कमी आहे, जी अंडरपास किंवा ग्रेड-विभाजित इंटरचेंजसाठी लागू असलेल्या IRC च्या तरतुदींना पूर्ण करत नाही. मानवाडी फाटा येथे झालेले अपघात iRAD data नुसार हे पूल बांधण्यात आलेला नसल्यामूळे झालेले आहेत, अशी बाब या कार्यालयाच्या निदर्शनास आलेली नाही. सदरील काम पूर्ण झाल्यानंतर व भविष्यात वाहतूक स्थिर झाल्यानंतर रस्ता सुरक्षा सल्लागारांमार्फत याठिकाणी उपाययोजनाबाबत विचार केला जाऊ शकतो.
(३) कन्सेशन करार (Concession Agreement) च्या अंतर्गत अनुबंधित अटींचे उल्लंघन झाल्यामुळे, वारंगा ते महागाव राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ च्या कामामध्ये मूळ कन्सेशानर (Original Concessionaire) ची बदली (through Harmonious Substitution) नवीन कन्सेशानर (New Concessionaire) द्वारे करण्यात आलेली आहे. तसेच, कन्सेशन कराराच्या (Concessions Agreement) तरतुदीनुसार, मानवाडी फाट्याजवळ चार लेन पेवड शोल्डर (4L+PS) व ३७० मीटर लांबीचा सर्व्हिस रोड देण्यात आलेला आहे. मानवाडी फाटा जंक्शन (Junction) साठी मेडियन

ओपनींग (Median Opening) सोडण्यात आलेले आहे. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही. .
(४) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

## इंदापूर, विजापूर ९६५ जी या राष्ट्रीय महामार्गाचे काम अपूर्णवस्थेत असल्याबाबत

**(१५) १३०३ (२५-०४-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदापूर, विजापूर ९६५ जी या राष्ट्रीय महामार्गाच्या कामास मंजूरी देण्यात आली असून, सदर रस्त्याचे काम अपूर्णवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यातील कडलास- माण नदीजवळ या महामार्गाचे काम गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कडलास- माण नदीजवळ या महामार्गाचे काम अपूर्णवस्थेत असल्याने या ठिकाणी वारंवार भीषण अपघात होऊन नागरिकांचे मृत्यू होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कडलास- माण नदीजवळ या महामार्गाचे अपूर्णवस्थेत असलेले काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१३-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे,

पाटस-बारामती-इंदापूर-अकलूज-सांगोला-जत हा राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५-जी असा आहे. यापैकी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत असलेल्या एकूण ४६.७ लांबीपैकी ४५.७० लांबीतील काम पूर्ण झाले असून उर्वरित काम एप्रिल-२०२५ पर्यत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

त्यापुढील काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वेळापूर ते महुद (कि.मी.१३७/४०० ते कि.मी.१६०/४००) महुद ते सांगोला (कि.मी.१६०/४०० ते कि.मी.१८५/४००) व सांगोला ते जत (कि.मी.१८५/३३९ ते कि.मी.२३०/१२३) अशा तीन भागांमध्ये काम प्रगतीत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सांगोला ते जत या एकूण ४४.७८४ कि.मी. लांबीतील दुपदरीकरणातील क्रॉकिटीकरणाचे व डांबरीकरणाचे रु.२५७.३८ कोटी रक्कमेचे काम सन २०१७-१८ मध्ये मंजूर झाले आहे. सदर कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक ३०.६.२०१८ रोजी देण्यात आला असून कामाची मुदत १८ महिने होती. सद्यस्थितीत ४२.८४ कि.मी. चे काम पूर्ण झाले आहे. या भागातील कडलास-माण नदीजवळील काम अंशत: पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीत आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

गृह विभागाकडील नोंदीनुसार सन २०२४ मध्ये एक अपघात झाल्याची नोंद आहे.

(४) व (५) सांगोला ते जत या लांबीतील काही ठिकाणी भूसंपादनास झालेल्या विलंबामुळे काम पूर्ण होण्यास विलंब झाला असून सद्यस्थितीत कडलास माण नदीजवळील महामार्गाचे काम प्रगतीत असून मे-२०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## कोल्हापूर आणि सांगली जिल्हयाच्या सीमेवर अंकली येथील कृष्णा नदीवरील पुलाच्या दुरुस्तीबाबत..

**(१६) १४०० (२८-०४-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर - सांगली जिल्हयाच्या सीमेवर अंकली येथील कृष्णा नदीवरील पुलाच्या परिसरात रस्त्याला मोठ-मोठे खड्डे पडले असणे, पुलाच्या दोन्ही बाजूला झाडेझुडपे वाढली असून पुलाच्या दोन्ही बाजूला सुचना फलक नसल्यामुळे अनेक वेळा लहान मोठे अपघात होवून त्यात अनेकांना आपला जीव गमवावा लागत असल्याचे माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृष्णा नदीच्या पुलाच्या परिसरात असलेल्या त्रुटी पूर्ण करुन होत असलेले अपघात व जीवीत हानी थांबविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१७-०६-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे,

रत्नागिरी-कोल्हापूर-सांगोला-सोलापूर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ हा केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित असून सदर रस्त्यावरील कोल्हापूर-सांगली जिल्हयाच्या सीमेवरील अंकली येथील कृष्णा नदीवरील पुलाच्या परिसरात २०२४ मध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे पडलेले खड्डे त्वरित भरण्यात आलेले होते.

पुलाच्या दोन्ही बाजूला सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सूचना व माहिती फलक लावण्यात आलेले असून पुलाच्या कडेला रेलिंग लावून सुरक्षा कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. माहे नोव्हेंबर-डिसेंबर-२०२४ या कालावधीत दिनांक २८.११.२०२४ रोजी कृष्णा नदीच्या पुलावर चारचाकी वाहनाचा अपघात झाल्याबाबत जयसिंगपूर पोलीस स्टेशन यांचेकडे तक्रार नोंद करण्यात आलेली आहे. सदर अपघात रस्त्यावरील खड्डयामुळे, सुरक्षा कामामुळे वा झाडे-झुडपामुळे झाल्याची नोंद नसून वाहनचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने झाल्याची नोंद आहे.
(२) कृष्णा नदीवरील पुलाच्या परिसरात पडलेले खड्डे त्वरीत भरण्यात आलेले असून, पुलाच्या दोन्ही बाजूला आवश्यक सुचना फलक लावण्यात आलेले आहेत. तसेच पूलाच्या कडेला रेलिंग लावून सुरक्षा उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

## पांढरवाडा (जि.यवतमाळ) शहरात बांधण्यात आलेल्या नवीन इमारतीत शासकिय कार्यालये सुरु करण्याबाबत.

**(१७) १४०७ (२८-०४-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरवाडा (जि.यवतमाळ) शहरात कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या पंचायत समिती, प्रकल्प कार्यालय, कोषागार कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या इमारती केवळ फर्निचर व इतर किरकोळ कामे शिल्लक असल्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून विना वापर पडून आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कार्यालयाच्या इमारतीतील उर्वरीत कामे अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून उर्वरीत काम तातडीने पूर्ण करुन संबंधित शासकीय कार्यालये नवीन इमारतीमध्ये सुरु करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१०-०६-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून फक्त कोषागार इमारतीचे बांधकाम करण्यात आले असून फर्निचर अभावी सद्य:स्थितीत विना वापर आहे.
(२) व (३) सदर इमारतींचे काम प्रगतीत असतांना उपभोक्ता विभागाने वेळोवेळी कामात बदल करण्याबाबत सुचविल्यामुळे स्थापत्य बांधकामाचा खर्च तरतूदीपेक्षा वाढल्यामुळे फर्निचरचे काम करणे शक्य झाले नाही.
फर्निचर कामाचे अंदाजपत्रक उपभोक्ता विभागाकडे सादर करण्यात आले असून निधी उपलब्ध होताच फर्निचरचे काम

पूर्ण करण्यात येईल.
प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जीएसटी कर प्रणाली लागू होण्यापूर्वी पूर्ण झालेल्या कामांचा परतावा व्यापाऱ्यांना देणे प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) १९१० (२३-०४-२०२५). श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ ऑगस्ट, २०१७ पासून जीएसटी कर प्रणाली लागू झालेली असून, तत्पूर्वी कार्यदेश दिलेल्या आणि दिनांक १ जुलै, २०१७ नंतर पूर्णत्वास आलेल्या कामांच्या बाबतीत जीएसटीमुळे अतिरिक्त बोजा पडत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्हॅट व इतर कर कपातीनंतर तफावतीच्या रकमेबाबत कंत्राटदाराने शासन निर्णयानुसार कार्यकारी अभियंता यांच्याकडे मागणी केल्यानंतरही परतावा मिळणेकामी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यवाहीसाठी दिरंगाई होत असल्याबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पासून पाठपुरावा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन परिपत्रकाची कठोर अंमलबजावणी करून कंत्राटदारांना परतावा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१२-०६-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तफावतीच्या रक्कमेबाबत मागणी केल्याचे अभिलेख्यावरुन आढळून येत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील कार्यालयीन अधीक्षक यांनी केलेला गैरव्यवहार.**

**(१९) १९३० (१०-०३-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील लिपिक तथा प्रभारी कार्यालयीन अधीक्षक यांनी श्रीमती स्वाती संखे यांच्यामार्फत लाच घेऊन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध कामांमध्ये गैरव्यवहार केला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत वेतनेत्तर अनुदान, शिक्षकांच्या बदल्या, निवृत्त शिक्षक कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन, कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयकांना मंजुरी, वरिष्ठ शिक्षकांना डावलून कनिष्ठ शिक्षकांचा समावेश करणे इत्यादी नियमबाह्य कामे आर्थिक संगनमत करुन करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिक्षा जवळ असताना शिक्षकांच्या बदल्या करित असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करुन दोषीना निलंबित करण्याची मागणी बहुजन विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष, श्री. अनिल वाणी यांनी आयुक्त, भिवंडी महानगरपालिका यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०३-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

श्री.वाणी यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने सखोल चौकशी केली असता, तक्रारीत तथ्य नसल्याचे आढळून आले.

(५) प्रश्न उद्भवत नाही. .

---

**केंद्र सरकारकडे जीएसटी भरपाई प्रलंबित असल्याबाबत**

**(२०) १९९१ (२३-०४-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जीएसटी कायदा लागू झाल्यानंतर राज्यांचे होणारे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी जीएसटी भरपाई कायद्याअंतर्गत देण्यात येणारी नुकसान भरपाई माहे जुलै २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पासून बंद झालेली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, माहे सप्टेबर २०१७ पासून जुलै २०२२ मध्ये वा त्यादरम्यान अखेरपर्यंत जीएसटी भरपाई कायद्याअंतर्गत राज्य शासनाने केंद्राकडे जीएसटी नुकसान भरपाईपोटी किती रकमेची मागणी केली आणि केंद्राने राज्यशासनाला जीएसटी नुकसान भरपाईपोटी किती रक्कम दिली आहे,

(३) असल्यास, जीएसटी भरपाई देण्याचा कालावधी संपला असला तरी महाराष्ट्र शासनाचे सुमारे १२८६ कोटी रुपयांची भरपाई केंद्र सरकारकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्राकडून सदर प्रलंबित भरपाई मिळावी यासाठी शासन काय पाठपुरावा करत आहे,

(५) असल्यास, देशातील काही राज्यांनी जीएसटी भरपाई कालावधी वाढवून देण्यात यावा यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला असून जीएसटी भरपाई कालावधी वाढवण्याबाबत राज्यशासन केंद्राकडे पाठपुरावा करत आहे काय किंवा त्याबाबत राज्य शासनाची भूमिका काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (०९-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे (माहे जून २०२२)

(२) राज्य शासनाने, माहे सप्टेंबर २०१७ पासून जून २०२२ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी केंद्राकडे रु.१,२०,५८७.६० कोटी एवढी रक्कम जीएसटी नुकसान भरपाईपोटी मागणी केलेली होती, ती माहे जानेवारी २०२५ अखेरपर्यंत पूर्णपणे प्राप्त झालेली आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) लागू नाही.

(५) ५४ व्या वस्तू व सेवा कर परिषदेच्या बैठकीत झालेल्या निर्णयाला अनुसरुन नुकसान भरपाई अधिकाराचा (Compensation cess) बाबत मंत्रीगटाची स्थापना करण्यात आली आहे व तिचा अहवाल प्रलंबित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही. .

---

**अर्थसंकल्पीय पुस्तके बॅगेतून देण्याची प्रचलित प्रथा बंद करण्याबाबत**

**(२१) १९९८ (२४-०४-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर विधानसभा, विधानपरिषद सदस्यांना अर्थसंकल्पीय पुस्तके बॅगेतून देण्याची प्रचलित प्रथा असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२५-२६ चा अर्थसंकल्प सादर करतेवेळी सदरील बॅग देण्यासाठी वित्त विभागाने शासनाने दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास काढलेल्या शासन निर्णयानुसार ८१.९२ लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, सदरील बॅग देण्याच्या प्रथेचा खर्च बघता तसेच डिजिटल इंडिया धोरण बघता खर्चात काटकसर करण्यासाठी सदरील बॅग देण्याची प्रथा बंद करण्यासाठी शासन विचाराधीन आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (१९-०५-२०२५) :** (१) होय.

(२) बॅग खरेदी संदर्भातील प्रशासकीय मान्यतेचा दिनांक १७ जानेवारी, २०२५ चा शासन निर्णय, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२५ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आला आहे. तथापि, सन २०२५-२६ चा अर्थसंकल्प सादर करतेवेळी हॅन्ड बॅग (Briefcase) खरेदी करण्यासाठी दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२५ च्या शासन निर्णयान्वये रु. २२.१९ लक्ष इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली व त्यानुसार सदर बॅगांची खरेदी करुन विधानमंडळ सदस्यांना बॅगांचे वाटप करण्यात आले आहे.

(३) पुढील अर्थसंकल्प सादर करतेवेळी याबाबत विचार करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

**नवापूर (जि. नंदुरबार ) तालुक्यातील बेडकीपाडा येथील R.T.O. चेकपोस्ट ते कोंडाईबारी ता. साक्री जि. धुळे पर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत.**

**(२२) २१३८ (२८-०४-२०२५). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर (जि. नंदुरबार) तालुक्यातील बेडकीपाडा येथील प्रादेशिक परिवहन (R.T.O. ) चेकपोस्ट ते कोंडाईबारी (ता. साक्री जि. धुळे) पर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गचे चौपदरीकरणाचे काम गेल्या ८ वर्षांपासून कंत्राटदारामार्फत अतिशय संथ गतीने व निकृष्ट दर्जाचे केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील चौपदरीकरणाचे काम संथ गतीने सुरु असल्यामुळे कोंडाईबारी घाट परिसरात अपघात होवून जीवितहानी होऊन मालमत्तेचे ही नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द कारवाई करण्यासह सदर काम तातडीने पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१३-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र-गुजरात हद्द ते धुळे-जळगाव-अकोला-अमरावती-नागपूर-भंडारा राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे आहे.

मे. ILFS (FSEL) यांचे काम पूर्ण करण्याची अंतीम तारीख दिनांक ०८.०५.२०१९ होती. परंतू त्याच्या आर्थिक अडचणीमूळे सदर काम दिनांक ०२.०८.२०१९ ला संपुष्टात आले. तसेच, उर्वरीत कामासाठी नवीन कंत्राटदार में. जे. एम म्हात्रे यांची नियुक्ती करण्यात आली असुन सदर काम प्रगतीपथावर आहे.

R.T.O. चेकपोस्ट ते कोंडाईबारी घाटात चौपदरीकरणाचे काम उड्डाणपुल कि.मी. ६०५.४०० वगळून जवळ जवळ पुर्ण झाले आहे. उर्वरीत काम हे ३० मार्च २०२५ पर्यंत पुर्ण होईल.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण कडून Authority Engineer, मे. थीम इंजिनीअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. यांची बांधकामाच्या देखरेखीसाठी या प्रकल्पावर प्राधिकरणाचे अभियंता म्हणून नियुक्ती केली आहे.

(२) सदरील कोंडाबारी घाटात रस्ता सुरक्षा उपाययोजना म्हणुन रंबल स्ट्रिप, पांढरे पट्टे, सूचना फलक, दक्षता फलक लावण्यात आलेले आहे. चौपदरीकरणाच्या सुरू असलेल्या कामात आवश्यक असलेल्या रस्ता सुरक्षेसंबंधित उपाययोजना कंत्राटदारामार्फत करण्यात येत आहेत.

(३) सदर काम वेळेत पूर्ण आणि दर्जेदार व करारनामानुसार करवुन घेण्यासाठी Authority Enginees, मे. थीम इंजिनीअरींग सर्व्हसेस प्रा.लि. यांची बांधकामाच्या गुणवत्ता व देखरेखीसाठी या प्रकल्पावर प्राधिकरणाचे अभियंता म्हणुन नियुक्ती केली आहे.

(४) सन २०१९-२१ मध्ये रस्त्याचे काम हे कोरोनामुळे बंद होते. त्यामुळे ठेकेदाराला काम पूर्ण करण्यासाठी अतिरीक्त कालावधी देण्यात आलेला आहे. तसेच ठेकेदारास सदर कामासाठी

(१) मुरूम, खडी उत्खनन करण्यासाठी NGT, Western Zone, Pune यांच्या आदेशामुळे (२) ROB च्या Utility Shifting साठी लागणारा वेळ (३) नवापुर, दहीवेल, नेर व वडजई या ठिकाणी लोकांच्या Demand मुळे COS मधील अतिरीक्त काम (४) आणि मौजे नवापुर व मौजे विसरवाडी जिल्हा नंदुरबार आणि मौजे धुळे या ठिकाणा वरील जमिन अधिग्रहण या कारणांमुळे सदर कामास विलंब झालेला आहे.

---

**नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बँकाकडून कर्जाऊ रक्कम घेताना नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची परवानगी घेणे आवश्यक असल्याबाबत**

**(२३) २१८६ (०१-०५-२०२५). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतामध्ये घराचे बांधकाम करतांना आणि त्यासाठी बँकाकडून कर्जाऊ रक्कम घेतांना नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची परवानगी घ्यावी लागते, असल्याचे शेतकरी बांधवांनी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा शेतातील विकासासंदर्भात कुठलाही संबंध नसतांना देखील अशा प्रकारची मागणी करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना शेतामध्ये घर अथवा फार्म हाऊस बांधण्यासाठी कर्जाऊ रक्कम घेतांना बँकांकडून अशा प्रकारची नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची परवानगी मागितली जाऊ नये यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही, यासंदर्भात नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे कोणत्याही तक्रारी प्राप्त नाहीत.

(२), (३) व (४) राज्यात महाराष्ट्र राज्यासाठी एकत्रित विकास नियंत्रण नियमावली (UDCPR) दिनांक ०३.१२.२०२० पासुन अमलात आलेली आहे. सदर नियमावलीतील नियम क्र.४.११ मधील अ.क्र. ix नुसार शेती विभागात किमान ०.४ हे. क्षेत्रात शेतघराचे बांधकाम करणे अनुज्ञेय आहे. परंतु नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीत समाविष्ट क्षेत्रामध्ये कोणतेही प्राधिकरण अथवा व्यक्तिस विकास काम हाती घ्यावयाचे असल्यास महाराष्ट्र महानगर विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ मधील कलम-१४ मधील तरतुदीनुसार प्राधिकरणाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

बँकांकडुन शेतामध्ये घर बांधकामासाठी कर्जाऊ रक्कम घेतांना नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. तसेच याबाबत शेतकरी बांधवांमार्फत प्राधिकरणाकडे अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त

झालेल्या नाहीत.

---

## खारघर,घणसाली व नवीमुंबई येथे मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहाकरिता जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(२४) २२७४ (०१-०५-२०२५). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहर व औद्योगिक विकास महामंडळाने (सिडको) विशेष घटक योजनेंतर्गत मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहाकरिता एमएमआरडीए क्षेत्रातील खारघर व घणसोली, नवी मुंबई येथे जागा देण्याचा निर्णय घेऊन तसे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्या सुमारास सामाजिक न्याय विभागात कळविले होते, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, उपरोक्त मागासवर्गीय मुला-मुलीच्या वसतिगृहाकरिता जागा मिळण्याकरिता सामाजिक न्याय विभागाकडून आवश्यक शुल्काचा व इतर शुल्काचा भरणा सिडकोकडे करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहाकरिता लवकरात लवकर जागा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०५-२०२५) :** (१), (२) व (३) सिडको संचालक मंडळाचा ठराव क्र.११७५२, दिनांक २४.११.२०१६ नुसार खारघर, सेक्टर-५ मधील भूखंड क्र.११, क्षेत्र ११७७ चौ.मी. व घणसोली सेक्टर-५ मधील भूखंड क्र.१, क्षेत्र १००० चौ.मी. हे भूखंड मागासवर्गीय मुला-मुलींचे शासकीय वसतीगृहासाठी भाडेपट्टयाद्वारे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास वाटप करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

उक्त भूखंडापैकी घणसोली येथील भूखंडाच्या अधिमुल्य शुल्क व इतर संकीर्ण शुल्क माहे डिसेंबर, २०१८ ते ऑगस्ट, २०२० या कालावधीत टप्प्याटप्प्याने अदा करण्यात आले आहे. सदर भूखंडाचा करारनामा दिनांक ९.३.२०२३ रोजी झाला असून सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग यांना सदर भूखंडाचा ताबा देण्यात आला आहे.

तथापि, खारघर येथील भूखंडाचा भाडेपट्टा रक्कम व इतर शुल्क रक्कमेचा भरणा सिडको महामंडळास करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

## माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील विविध गावांना मुख्य शहराला जोडणारे अनेक रस्ते दर्जोन्नत करण्याबाबत.

**(२५) २२८० (२८-०४-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील विविध गावांना मुख्य शहराला जोडणारे अनेक रस्ते नादुरुस्त झाले असल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्यामुळे सदर रस्ते दर्जोन्नत करण्यासंदर्भातील प्रस्ताव गेल्या अनेक महिन्यापासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील रस्ते दर्जोन्नत करण्याच्या प्रलंबित प्रस्तावास तात्काळ मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१३-०६-२०२५) :** (१) होय.हे खरे आहे.

(२) होय.हे खरे आहे.
(३) रस्त्याच्या दर्जोन्नती करीता शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.६५/नियो-२, दिनांक २०/०७/२०१६ मध्ये नमुद निकाषाच्या अधिन राहुन उचित कार्यवाही करणेचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**केज,( जि. बीड) येथील रस्त्यांची प्रमुख जिल्हा मार्गासाठी दर्जोन्न्ती करण्याबाबत**

**(२६) २३२२ (२४-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज, (जि. बीड) येथील एकूण १६ रस्ते दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असून सदर रस्त्यावर वाहनाची मोठ्याप्रमाणात वर्दळ असून त्यामुळे सदर रस्त्यांची प्रमुख जिल्हा मार्गासाठी दर्जोन्न्ती करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक १८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने किती रस्त्यांची प्रमुख जिल्हा मार्गासाठी दर्जोन्न्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१७-०६-२०२५) :** (१) होय,निवेदन प्राप्त आहे.
(२) रस्त्याच्या दर्जोन्नती करीता शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-२०१४/प्र.क्र.६५/नियो-२ दिनांक २०/०७/२०१६ मध्ये नमुद निकषाच्या अधिन राहुन उचित कार्यवाही करणेचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**जोगेश्वरी-विक्रोळी मेट्रो -६ पुनर्वसनाबाबत नागरिकांना दिल्याबाबत**

**(२७) २४०७ (०१-०५-२०२५). श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगेश्वरी-विक्रोळी प्रकल्पाच्या मुं.म.प्र.वि.प्र. यांनी मेट्रो -६ स्वामी समर्थ नगर प्रकल्पांतर्गत भूसंपादन व पुनर्वसनाबाबत नागरिकांना दनिांक ५ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास नोटीसा जारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुं.म.प्र.वि.प्रा.अंतर्गत प्रारुप सादर करण्यात येऊन त्यात निवासी-अनिवासी बांधकाम पात्र दाखविण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपजिल्हाधिकारी, मेट्रो- ६ मुं.म.प्र.वि.प्रा. यांनी माहे डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान बांधकाम मेट्रोमार्गिका -६ च्या संरेखनेच्या हद्दीबाहेर असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकाकडून योग्य ती कार्यवाही करण्याचे पत्र काढले असून बृहन्मुंबई महानगरपालिकेने बांधकामाची पात्रता निश्चित न करता निष्कासित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बाधित लोकांचे पुनर्वसन करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
यापूर्वी मुंबई मेट्रो मार्गिका-६ व दुमजली उड्डाणपुल व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरक्षित रस्ता आरखड्यातील

डबलडेकर स्ट्रक्चर मधील २७७ बाधित बांधकामाचा सर्वेक्षण करण्यात येऊन, दिनांक ०५/११/२०१९ रोजी २७२ बांधकामधारकांना पुरावे सादर करण्याबाबत नोटीस बजावण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

मुंबई महानगर प्रदेशिवकास प्राधिकरणांतर्गत २७२ प्रकल्पबाधितांचे प्रारुप परिशिष्ट सादर करण्यात आले होते. परंतू, प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या मेट्रो मार्गिका-६ प्रकल्पातील १६५ बांधकामधारकांचे अंतिम परि-II तयार करुन, पुनर्वसनाची योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) व (४) माहे डिसेंबर २०२२ मध्ये जोगेश्वरी विक्रोळी जोड रस्त्याच्या संरेखनामध्ये येणाऱ्या बांधकामांवर निष्कासनाची मुंबई महानगर प्रदेशिवकास प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे संयुक्तिक रित्या करण्यात आली होती. निष्कासित बांधकामधारकांपैकी पात्र बांधकामधारकांना मुं.म.प्र.वि.प्रा. मार्फत यापूर्वी मोबदला देण्यात आलेला आहे. तसेच, सदर ठिकाणी पुनश्चः बांधकाम करण्यात आल्याकारणाने बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेशिवकास प्राधिकरणातर्फे अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

जेव्हीएलआर मार्गातील बाळासाहेब ठाकरे उड्डाणपुल हा एस.व्ही. रोड ते इन्फिनिटी मॉल लिंक रोड पर्यंतचा विस्तारीत ब्रीज व रस्ता येथील भूभाग क्र. ६५१ अ मौजे ओशिवरा हा भूभाग महानगरपालिकेच्या मालकीचा असून सदर भूभागावर असलेले १३ बाधित अतिक्रमणे पात्रता निश्चित करुन महानगरपालिकेमार्फत ०६.११.२०२३ रोजी निष्कासित करण्यात आलेली असून एमएमआरडीएला रस्ता बनविण्यास मोकळा करुन देण्यात आला आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेशी संबंधित ठिकाणच्या बाधित होणा-या एकूण ३९ बांधकामांना नोटीसा देऊन त्यांचे अंतिम परिशिष्ट-२ तयार करण्यात आलेले आहे. त्यातील ०५ निवासी पात्र बांधकामांना प्राधिकरणामार्फत पर्यायी सदनिका देण्यात येणार असून अपात्र बांधकामांचे निष्कासन फेब्रुवारी २०२५ मध्ये नियोजित आहे.

उर्वरित रस्त्याच्या भागावरती असलेली अतिक्रमणे ही एसआरए यांच्यामार्फत चालू असलेल्या प्रकल्पामध्ये समाविष्ट असल्याने याबाबत महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम १९७१ चे कलम ३८ (२) अन्वये सक्षम प्राधिकारी -४, झोपुप्रा, बृहन्मुंबई यांच्याकडे कार्यवाही सुरुआहे.

५) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

**भाईंदर - नायगांव दरम्यान वसई खाडीवर प्रस्तावित मेट्रो मार्ग - १३ सहित खाडी पूलाच्या प्रस्तावास मान्यता देऊन निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(२८) २५६१ (०१-०५-२०२५). श्री.राजन नाईक (नालासोपारा), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विस्तारित मुंबई नागरी पायाभुत सुविधा (Extd. MUIP) प्रकल्पांअंतर्गत नायगांव भाईंदर दरम्यान वसई खाडीवर दुपदरी पूलाच्या बांधकामाकरिता प्राधिकरणाच्या १२० व्या बैठकितील ठरावानुसार रु. १०० कोटी इतक्या प्रशासकीय खर्चास दिनांक २४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मान्यता देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) यांच्यामार्फत करण्याचे ठरविले होते, तथापी महामंडळाकडून विलंब झाल्यामुळे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सदर प्रकल्प राबविण्याचे ठरले व प्राधिकरणाच्या १३७ व्या बैठकित सदर पुलाच्या बांधकामाकरिता रु. ८७५.५४ कोटी एवढी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राधिकरणाच्या १४४ व्या बैठकित दिनांक १२/०१/२०१८ रोजी ठराव क्र. १४४२ अन्वये
रू. १,५०१.१६ कोटी इतक्या सुधारित प्रशासकीय खर्चास देखील मान्यता देण्यात आल्याची बाब समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पासाठी संबंधित प्राधिकरणाच्या लागणा-या बहुतांश परवानग्या देखील प्राधिकरणास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वसई- विरार शहर परिक्षेत्रात राहणा-या नागरिकांना मुंबईतील सोयी - सुविधांचा लाभ सुलभतेने मिळण्याकरिता सदरहु प्रकल्पाला तातडीने मंजुरी देऊन निधीची उपलब्धता करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०२५) :** (१), (२) व (३) होय, खरे आहे.

(४) सदर प्रकल्पाच्या मान्यतेच्या अनुषंगाने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड (MMB), भारतीय अंतर्देशिय जलमार्ग प्राधिकरण (IWAI) व महाराष्ट्र सागरी नियंत्रण क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांच्या परवानग्या प्राप्त झाल्या आहेत. वन जमिन व मिठागर यांच्या परवानग्या प्रलंबित आहेत. तथापी, सदर खाडी पूल हा मुंबई मेट्रो मार्ग -१३ (घोडबंदर पुल ते विरार) सोबत एकत्रित बांधण्याचे प्रस्तावित असल्याने सदर परवानग्या पुनःश्च प्राप्त करणे आवश्यक आहे.

(५) मुंबई मेट्रो मार्ग-१३ हा सुभाषचंद्र बोस स्टेडियम ते वसई-विरार ग्लोबल सिटी असा २६ कि.मी. चा उन्नत मार्ग आहे. या पर्यायामध्ये मुंबई मेट्रो मार्गिका १३ ही मेट्रो मार्गिका ९ ला जोडण्यात येणार आहे. नायगाव खाडीवरुन नायगाव भाईंदर दरम्यान  तीन पदरी पुलाचे बांधकाम व या खाडीवरुन  मेट्रो मार्गिका-१३ अशा एकत्रित दुमजली खाडीपूल उभारण्याचे नियोजित आहे. त्यामुळे पर्यावरणाच्या तसेच इतर आवश्यक परवानग्या एका वेळी मिळविण्याच्या व खर्चामध्ये बचत करण्याकरीता हा एक चांगला पर्याय असल्यामुळे मे.डी.एम. आर. सी.  यांची सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याकरीता नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर त्यास प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही प्राधिकरणामार्फत करण्याचे प्राधिकरणाचे नियोजित आहे.

---

## पालघर जिल्ह्यातील रस्ते विविध लेखा शीर्षकाखाली बनवले जात असल्याबाबत

**(२९) २६२३ (२८-०४-२०२५). श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील विविध एकाच ठिकाणचे रस्ते विविध लेखा शीर्षकाखाली (नाबार्ड, आदिवासी विकास विभाग, जिल्हा परिषद विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग द्वारे) बनवले जात असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधित दोषी अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१७-०६-२०२५) :** (१) निवेदन प्राप्त आहे.

(२) सदर कामांच्या तपासणी अंती व्दिरुक्ती  झाल्याचे  आढळून आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जव्हार (जि.पालघर) येथील जय सागर जलाशय दुर्लक्षित होत असल्याबाबत

**(३०) २६२४ (०१-०५-२०२५). श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार नरेश राजे यशवंतराव मुकणे महाराज यांनी ६० वर्षांपूर्वी जव्हार संस्थानातील नागरिकांना पाण्याची समस्या उद्भवू नये म्हणून जय सागर जलाशयाची चे निर्मिती केली असून जव्हार शहरवासीयांना पाणीपुरवठा होण्याचे जय सागर जलाशय हे एकमेव मात्र असे स्त्रोत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी नाशिक, मुंबई, ठाणे, पुणे, पालघर, सेलवास भागातून सुट्टीच्या दिवशी आलेल्या पर्यटकांकडू मोठ्या प्रमाणावर कचरा फेकला जात असल्याने दुर्गंधी पसरुन पाणी दूषित होत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे जव्हार मधील नागरिकांना पिण्याचा पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जव्हार मधील लोकांना शुद्ध व चांगले पिण्याचे पाणी मिळण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०७-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) जव्हार नगरपरिषदेच्या हद्दीतील जयसागर धरणावर सुट्टीच्या दिवशी बाहेरील जिल्हयातील पर्यटक पर्यटनासाठी येत असतात. परंतू पर्यटकांना धरणाच्या पाण्याजवळ थांबण्यास नगरपरिषदेकडून मज्जाव केला जातो.त्यामुळे पर्यटकाकडून कचरा फेकून दुर्गंधी पसरुन पाणी दुषित होत नाही. तसेच जलाशयाच्या सुरक्षेसाठी सभोवताली तारेचे कुंपण करण्यात आलेले असून पोलीस कर्मचाऱ्यांची गस्तही घालण्यात येते.
(३) व (४) जव्हार शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी खडखड धरण येथून नवीन पाणी पुरवठा योजना उभारण्यात आली असून खडखड धरण व जयसागर धरण अशा दोन्ही धरणातील पाण्याचा पुरवठा नियमितपणे करण्यात येतो.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धाराशिव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी बनावट देयके काढुन केलेला गैरव्यवहार**

**(३१) २७६८ (०८-०३-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव नगरपरिषदेच्या विद्यमान मुख्याधिकारी श्रीमती. वसुधा फड यांनी धाराशिव नगरपरिषद अंतर्गत लेखासंहिता सन २०१३ प्रकरण कामे अंतर्गत नियम १३८ प्रमाणे कार्यवाही करीता कामांचा छाननी तक्ता तयार करून विविध विभागातील बनावटी देयके काढली असल्याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीसाठी जिल्हाधिकारी धाराशिव यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणुक केलेली आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदरील आदेशान्वये जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धाराशिव यांनी दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी ४ सदस्याची समिती नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नगर पालिकेत अभिलेख / संचिका उपलब्ध नसल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०३-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या दिनांक १०.०१.२०२५ रोजीच्या आदेशान्वये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद धाराशिव यांच्या अध्यक्षतेखाली ४ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास अद्याप प्राप्त झालेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

**राष्ट्रीय महामार्ग नांदगांव पेठ मोर्शी- वरुड पांढुर्णा या महामार्गावर**
**नव्याने सुरु करण्यात आलेल्या टोल नाक्याबाबत**

**(३२) २८११ (२४-०४-२०२५). श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम**

**(सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय महामार्ग अमरावती- नागपूर व अमरावती – मोर्शी- वरुड पांढुर्णा या महामार्गाकरीता नांदगांव पेठ हद्दीत टोल नाका कार्यरत असतांना सुद्धा मोर्शी वरुड पांढुर्णा मार्गावर नव्याने टोल सुरु करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियमाप्रमाणे ७० कि.मी पर्यंत रस्ता व्यवस्थित असेल तरच टोल आकारण्यात येत असतानाही नांदगांव पेठ – मोर्शी – वरुड – पांढुर्णा रस्त्याचे काम अपूर्ण असतांना सुध्दा नव्याने निंभी येथे टोल वसुली सुरु करण्यात येत असल्याने नागरिकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागातील तसेच नियमीत ये-जा कराव्या लागणाऱ्या शेतकऱ्यांना व अन्य व्यक्तींना चारचाकी वाहनासाठी तसेच शेतमाल वाहून नेणाऱ्या वाहनासाठी टोल रद्द करण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वरुड- मोर्शी कडे जाणाऱ्यांना नागरीकांना केवळ ८ कि.मी. करीता आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, नांदगांव पेठ मोर्शी वरुड पांढुर्णा पर्यंतचे काम अनेक वर्ष प्रलंबित असल्याने मोठ्या प्रमाणात अपघातात वाढ होवून जीवीत हानी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन टोल रद्द करुन प्रलंबित महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१३-०६-२०२५) :**(१) हे खरे आहे,

नांदगांव-पेठ-मोर्शी-वरुड-पांढुर्णा हा राष्ट्रीय महामार्ग क्र.३५३-K असून नागपूर-अमरावती-अकोला-खामगांव हा राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ वरील टोल आकारणी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत करण्यात येत असून राष्ट्रीय महामार्ग क्र.३५३-K वरील टोल उभारणी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येऊन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे टोल आकारणीकरिता हस्तांतरित करण्यांत आले आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ वरील टोल प्लाझा नांदगांव पेठ येथे असून येथील टोल आकारणी एप्रील २०१३ पासुन सूरू आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र.३५३-K येथील टोल प्लाझा निंभी येथे असून येथील टोल आकारणी डिसेंबर २०२४ पासुन सूरू आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ३५३ हे दोन्ही स्वतंत्र राष्ट्रीय महामार्ग आहेत.
(२) सदर महामार्गावर निंभी (साखळी क्र. ३०/४८०) येथे शासनाच्या दिनांक २४.०८.२०२३ रोजीच्या टोल अधिसुचनेप्रमाणे टोल प्लाझा उभारण्यात आला आहे.
(३) हे खरे नाही,
(४) हे अशंत: खरे आहे,

राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ वरुन मोर्शी-वरुड कडे जाणाऱ्या नागरिकांना विचारात घेऊन राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ वरील नांदगाव पेठ हद्दीत नागरिकांना स्मार्ट कार्डची सोय उपलब्ध करुन देण्यात आली असून त्यानुसार त्यांना टोल मध्ये ७५ टक्के सवलत देण्यात आली आहे.
(५) हे अशंत: खरे आहे,

राष्ट्रीय महामार्ग क्र.३५३ k रत्याची दर्जोन्नतीचे काम सन २०१७ मध्ये मंजूर झाले असून सदर प्रकल्पातील ९५.३९ कि.मी. एकूण लांबीपैकी ७३.९९ कि.मी. लांबीमध्ये दुपरीकरण (२ लेन व Paved Shohlders व १४.३ कि.मी. लांबीमध्ये दुपरीकरणाचे काम (१ लेन व Paved Shoulders) असे एकूण ८८.२९ कि.मी. लांबीचे काम सन २०१९ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित ७.१ कि.मी. वन क्षेत्रातील रस्त्याच्या लांबीचे बांधकाम वनविभागाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर करण्याचे नियोजन आहे.

सद्यस्थितीत सदर रस्त्याची देखभाल दुरुस्ती कंत्राटदारामार्फत करण्यात येत असून रस्त्याच्या दर्जोन्नतीमुळे अपघातांच्या संख्येमध्ये घट झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही. .

---

**इचलकरंजीचे (जि.कोल्हापूर) महानगरपालिकेत शासनाने जीएसटी प्रतिपूर्ती महानगरपालिकेस वर्ग केली नसल्याबाबत**

**(३३) २८५९ (२४-०४-२०२५). श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) नगरपालिकेचे सन २०२२ मध्ये महापालिकेत रूपांतर झाल्यानंतर गेल्या दोन वर्षापासून जीएसटी प्रतिपूर्ती अनुदान शासनाने महापालिकेस वर्ग केलेले नाही, हे खरे आहे काय

(२) असल्यास, जीएसटी परताव्याच्या यादीत इचलकरंजी महानगरपालिकेचे नाव समाविष्ट करण्यात आलेले नसल्यामुळे माहे नोव्हेंबर, २०२४ अखेर तब्बल १००९ कोटी रुपयाचे अनुदान थकीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जीएसटी परताव्याच्या यादीत इचलकरंजी महानगरपालिकेचे नाव समाविष्ट न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने इचलकरंजी महानगरपालिकेचे जीएसटी प्रतिपूर्तीचे थकीत अनुदान तात्काळ अदा करण्याच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (०२-०७-२०२५) :** (१), (२), (३) व (४) दिनांक २७.०५.२०२५ रोजी झालेल्या मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये इचलकरंजी महानगरपालिकेचे नाव महाराष्ट्र वस्तू व सेवा कर, (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत) अधिनियम, २०१७ अन्वये इचलकरंजी महानगरपालिकेचा समावेश परिशिष्टामध्ये समावेश करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने वित्त विभाग क्र.एमजीएसटी-१०२५/प्र.क्र.१९/कराधान-१, दिनांक २४.०६.२०२५ रोजी अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे.

---

**कुही (जि. नागपूर) तालुक्यातील कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी मुख्यालयाच्या ठिकाणी शासकीय वसाहतीचे बांधकाम करण्याबाबत**

**(३४) २९९३ (२८-०४-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुही (जि.नागपूर) तालुक्यातील कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्यासाठी शासकीय वसाहत उपलब्ध नसल्याने त्यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्या तहसील आणि पंचायत समितीच्या बाजूला असलेली कर्मचाऱ्यांची जीर्ण झालेली शासकीय वसाहत पाडण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्यापैकी ९० टक्के कर्मचारी/ अधिकारी शासकीय निवासस्थान उपलब्ध नसल्याने नागपूर येथे वास्तव्य करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी मुख्यालयाच्या ठिकाणी वास्तव्यासाठी शासकीय वसाहतीचे बांधकाम करण्याचे काम तातडीने हाती घेण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१०-०६-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

अंदाजे ४१० अधिकारी / कर्मचारी सदर ठिकाणी कार्यरत असून २१ निवासस्थाने उपलब्ध आहेत.
(२) हे खरे नाही
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही. .
प्रस्ताव / मागणी प्राप्त झाल्या नसल्याने नविन निवासस्थान बांधकामाचा प्रस्ताव मंजूरीकरिता सादर करण्यात आला नाही.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**यवतमाळ नगरपरिषदेतील हद्दवाढ भागात नागरी सुविधा देण्याबाबत**

**(३५) ३१०९ (०१-०५-२०२५). श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ नगरपरिषदेतील हद्दवाढ भागात पाणी, रस्ते, पथदिवे, सांडपाणी वाहिन्या, स्मशानभूमी इ.नागरी सुविधांचा अभाव असल्याचे माहे डिसेंबर २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिकारी व कर्मचारी बनावट पावती देवून दैनदिन बाजार वसूली करुन नगरपरिषदेचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान करीत आहेत हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन तातडीने दर्जेदार नागरी सुविधा देणे व गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.
यवतमाळ नगरपरिषदेच्या हद्दवाढ भागात वैशिष्टपूर्ण योजनेअंतर्गत २५१ रस्त्यांची कामे करण्यात आली आहेत. तसेच शासन पुरस्कृत ई.ई.एस.एल. कंपनीमार्फत हद्दवाढ क्षेत्रामध्ये उर्जा बचतीचे एल.ई.डी. पथदिवे बसविण्यात आले आहेत. यवतमाळ शहरातील हद्दवाढ झालेल्या भागात पाणीपुरवठा करणेसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत वाढीव पाणीपुरवठा योजना व सांडपाणी मलनि:स्सारण व्यवस्थापनासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत मलनि:स्सारण योजना मंजूर करण्यात आली आहे. या दोन्ही योजनांची कार्यान्वयन यंत्रणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण असून दोन्ही योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील चिखली-कुदळवाडी येथील**
**गोदामांना लागलेल्या भीषण आगीबाबत**

**(३६) ३१३१ (०२-०३-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील चिखली-कुदळवाडी येथील गोदामांना लागलेल्या भीषण आगीमध्ये किमान ३५ ते ४० गोदामे जळून भस्मसात झाली असल्याचे दिनांक ९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापैकी अनेक गोदामे अनधिकृत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक गोदामांमध्ये अग्निप्रतिबंधक यंत्रणा कार्यान्वित नसल्याने आग लागली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत गोदामे हटविणे, गोदामांमध्ये अग्निप्रतिबंधक यंत्रणा

कार्यान्वित करणेबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०३-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

या दुर्घटनेमध्ये एकूण ३६ गोदामे भस्मसात झाली.

(२) होय, हे खरे आहे.

४४४९ अनधिकृत मिळकती / गोदामे / आस्थापनांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

महानगरपालिका अग्निशामक विभागाकडून घटनेपूर्वीच अश्या गोदामांमध्ये अग्नि प्रतिबंधक यंत्रणा/उपाय योजनाचे अनुपालन न केल्यामुळे ३८५८ मिळकतींना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

(४) महानगरपालिका अग्निशामक विभागाकडून अग्निप्रतिबंधक उपाययोजनाचे अनुपालन न केल्यामुळे ३८५८ मिळकतींना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत तसेच या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर मनपा प्रशासनाकडून कुदळवाडी-चिखली परिसरातील ४४४९ अनधिकृत मिळकती/गोदामे/आस्थापनांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच सदर परिसरातील महापालिकेच्या राखीव जागेवरील साधारणपणे ४१२५ अनधिकृत मिळकती/गोदामे ब्लॉक बाय ब्लॉक हटविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

## महाराष्ट्राची कुलस्वामीनी तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्र विकासाच्या आराखडयास मंजूरी देण्याबाबत

**(३७) ३२६९ (२३-०४-२०२५). डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राची कुलस्वामीनी तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्र विकासाच्या आराखडयास दिनांक १६ सप्टेंबर, २०२३ रोजी छत्रपती संभाजी नगरच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत सुमारे १ हजार ३२८ कोटीचा निधी मंजूर करण्यांत आलेला असून अंतिम मंजूरीसाठी मा. मुख्यमंत्री महोदयांच्याकडे प्रशासकीय मान्यतेसाठी दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तुळजापूर शहरातील नागरीक आणि पुजारी बांधवांना विश्वासात घेऊन भूसंपादन करावे लागणार असून, बाधितांना देण्यात येणाऱ्या मावेजाची रक्कम पहाता सदर आराखड्यास सुमारे २ हजार १०० कोटीचा खर्च अपेक्षीत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, "श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिराचा रु.१९९९.३८ कोटीचा विकास आराखड्याचा" प्रस्ताव दिनांक ७ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव परिपूर्ण नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरेआहे काय,

(४) असल्यास, मागविण्यात आलेल्या सुधारित प्रस्तावाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये रु.२१०० कोटींचा प्रस्ताव प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२५ रोजी उच्चाधिकार समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता तसेच समितीच्या बैठकीत समितीने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने कार्यवाही करुन सुधारित प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तुळजाभवानी मंदिर विकास लवकर होण्याच्या दृष्टीने सुधारित प्रस्तावाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१७-०६-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १६.०९.२०२३ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत तीर्थक्षेत्र श्री.

तुळजाभवानी मंदिर विकास आराखडा रू.१३२८/- कोटी मंजुरीबाबत घोषणा करण्यात आली होती. श्री. तुळजाभवानी मंदिर विकास आराखडयाच्या किंमतीत वाढ होऊन रू.२१००.७० कोटी रकमेचा आराखडा जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी सादर केला आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) होय हे खरे आहे.

दिनांक ०७.१०.२०२४ व दिनांक १०.०१.२०२५ रोजीच्या पत्रांन्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावास जिल्हाधिकारी धाराशिव यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची व मा. पालकमंत्री धाराशिव यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीची मान्यता घेण्यात आली नव्हती.

(४) व (५)

दिनांक २७.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हास्तरीय कार्यकारी समिती व जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेचे इतिवृत्त शासनास प्राप्त झाले. उच्चाधिकार समितीच्या दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार नमूद मुद्यांची पूर्तता करून श्री. तुळजाभवानी मंदिर विकास आराखडा शासनास फेरसादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. तथापि, सुधारित प्रस्ताव अप्राप्त होता.

तद्नंतर, उच्चाधिकार समितीची दिनांक १७ मार्च, २०२५ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत प्रस्तुत आराखड्याच्या अनुषंगाने आवश्यक निर्देश देऊन रू.१८६५.०० कोटी किंमतीचा श्री. तुळजाभवानी मंदिर विकास आराखडा प्रस्ताव शिखर समितीकडे सादर करण्यासाठी सहमती दर्शविण्यात आली होती.

दिनांक ०६.०५.२०२५ रोजीच्या मंत्रीपरिषदेच्या बैठकीत रुपये १८६५.०० कोटी किंमतीच्या विकास आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली व त्यास अनुसरून दिनांक २८.०५.२०२५ रोजी रुपये १८६५.०० कोटी किंमतीचा प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

---

## मराठवाड्यातील ८ जिल्हयाच्या विकाससाठी शासनाने मंजूर केलेला निधी वितरीत करण्याबाबत

**(३८) ३३६५ (२३-०४-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील ८ जिल्हयाच्या विकाससाठी शासनाने ३ हजार ४९० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला त्यापैकी ४० टक्के म्हणजे १३९८ कोटी ५२ लाख इतका निधी १० महिन्यात या जिल्ह्यांना वितरित करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरु आर्थिक वर्ष संपण्यासाठी अवघे २ महिने शिल्लक असताना देखील अजूनही उर्वरीत ६० टक्के निधीचे वितरण करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठवाडा जिल्हात शिक्षण, आरोग्य, सिंचन कृषी क्षेत्राचा विकास करण्याच्या दृष्टीने उर्वरित निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (१२-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही

मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांच्या विकासासाठी शासनाने मंजूर केलेल्या ३ हजार ४९० कोटी रुपयांच्या निधीपैकी ६० टक्के म्हणजेच रुपये २०९६ कोटी ६० लक्ष निधी जानेवारी २०२५ अखेरपर्यंत वितरीत करण्यात आला आहे.

(२), (३) व (४)

फेब्रुवारी २०२५ अखेर मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांना अर्थसंकल्पीत करण्यात आलेले नियतव्यय बी.डी.एस. प्रणालीवर १०० टक्के वितरीत करण्यात आला आहे.

---

## प्रधानमंत्री मुद्रा योजनेतील सर्वाधिक कर्ज थकबाकी वसुली करण्याबाबत

**(३९) ३७९५ (३०-०४-२०२५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री 'मुद्रा' योजनेच्या थकीत कर्जाच्या प्रमाणात गेल्या तिमाहीत पुन्हा वाढ झाली असून, आता हे प्रमाण वितरित कर्जाच्या १२ टक्क्यांपर्यंत पोहोचले असून. योजनेतील ४५,४६९ खात्यांतून ५,५२७ कोटी रुपये थकविले गेले असल्याचे बँकांचा अहवाल आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुद्रा योजनेतील कर्ज थकबाकीची वसुली करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (२८-०५-२०२५) :** (१) अशंत: खरे आहे. राज्यस्तरीय बँकर्स समिती, पुणे यांनी दिलेल्या अहवालानूसार, दि.३१.१२.२०२४ अखेर रू. ४६,४४९ कोटी इतकी रक्कम मुद्रा योजनेमधून येणे बाकी होते, त्यापैकी अनुत्पादक मालमत्ता (NPA) रू. ५,६६८ कोटी असून हे प्रमाण १२.२० टक्के इतके होते. दिनांक ३१.०३.२०२५ अखेर रू. ५०,५२० कोटी इतकी रक्कम मुद्रा योजनेमधून येणे बाकी असून त्यापैकी अनुत्पादक मालमत्ता (NPA) रू. ५,६१६ कोटी आहे व हे प्रमाण ११.११ टक्के इतके आहे.

(२) सदर थकीत कर्जाची वसुली करण्यासाठी बँकांकडून अनेक उपाययोजना करण्यात येतात. यामध्ये कर्जदाराकडून थकीत कर्जाबाबत नियमित पाठपुरावा, एकरकमी पैसे भरण्यासाठीचा वन टाईम सेटलमेंट पर्याय उपलब्ध करुन देणे, क्रेडीट गॅरंटी कवरेज, अनुत्पादक मालमत्ता (NPA) वसुली व्यवस्थापन तंत्र, अत्याधुनिक डिजिटल ट्रॅकिंग व्यवस्था तसेच कायदेशीर कार्यवाही व वसुली प्रकिया यासारख्या उपाययोजनांचा बँका व वित्तिय संस्थांमार्फत अवलंब केला जातो. बँकांमार्फत केल्या जाणाऱ्या अशा उपाययोजनांमुळे मुद्रा योजनेंतर्गत थकबाकीचे प्रमाण कमी करण्यात व वसुलीचा दर सुधारण्याचे प्रयत्न सुरु आहेत

(३) प्रश्न उद्भवत नाही. .

---

## सोलापूर शहरातील रेशन दुकानातून श्रीशापी चहापत्ती विक्री करण्यास बंदी घालण्याबाबत

**(४०) ४२१२ (२८-०४-२०२५). श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरांमध्ये परिमंडळ अ, ब, क, ड विभागात ३०५ स्वस्त धान्य दुकान असून त्यापैकी २८० स्वस्त दुकानांमध्ये शहरातील रेशन दुकान संघटनेचे अध्यक्ष श्री. पेंटर यांचे श्रीशापी नावाची चहापत्ती ग्राहकांना सक्तीने विकत घेण्यासाठी त्रास देत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चहापत्तीच्या विक्रीतून या सर्व परिमंडळाचे अधिकारी यांच्या संगनमताने होत असलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करून बेकायदेशीर विकल्या जाणाऱ्या चहापत्तीची विक्री तात्काळ बंद करण्याबाबत मा.मंत्री महोदयांना स्थानिक लोकप्रतिनिधिनींकडून निवेदन दिले गेले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार सोलापूर शहरातील रेशन दुकानातून श्रीशापी चहापत्ती विक्री करण्यास बंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या सर्व अ, ब, क, ड परिमंडळातील संबंधित अधिकारी व श्री. पेंटर यांची चौकशी करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०२-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.

सोलापूर शहरांतील परिमंडळ अ, ब, क, ड कार्यालयामध्ये रास्तभाव दुकानदार अथवा शिधापत्रिका धारक यांची कोणतीही तक्रार आजतागायत प्राप्त नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

तथापि साथी धर्मराज राणू पवार,जि. सोलापूर यांनी दिनांक १७/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मा. अध्यक्ष, अन्न आयोग महाराष्ट्र राज्य यांचेकडे तक्रार अर्ज केला आहे.

अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर यांनी सोलापूर शहरांतील परिमंडळ अधिकारी अ,ब,क,ड यांना दिनांक २२/०१/२०२५ व दिनांक ०५/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये शिधापत्रिकाधारक यांना चहापत्ती घेण्याबाबत सक्ती करण्यात येऊ नये अशा सूचना सर्व रास्तभाव दुकानदारांना देण्याबाबत कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही. .

---

**सिडको महामंडळाने महत्वाकांक्षी प्रकल्पांना गती देऊन पूर्णत्वास नेण्याबाबत**

**(४१) ४२२९ (०१-०५-२०२५). अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील सिडको महामंडळाने हाती घेतलेले नैना, मेट्रो, विमानतळ, कॉर्पोरेट पार्क, गृहनिर्माण आदी महत्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लावन्याचे आव्हान सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांच्या समोर असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको महामंडळावर सुमारे १,१३० कोटी रुपयांचे कर्ज असल्याने सिडकोची आर्थिक परिस्थिती कमकुवत झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महत्वाकांक्षी प्रकल्पांना गती देऊन पूर्णत्वास नेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही. तथापि नवी मुंबई मध्ये सिडको महामंडळाने नैना. मेट्रो, विमानतळ, कॉर्पोरेट पार्क, गृहनिर्माण आदी महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतलेले आहेत. त्यापैकी नवी मुंबई मेट्रो मार्ग १ हा प्रकल्प पूर्ण होऊन कार्यान्वित झालेला आहे आणि सिडको गृहनिर्माण योजनेअंतर्गत २५७२३ घरांची सिडकोने लॉटरी काढून त्यापैकी १५१८२ घरांची वाटप करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येत आहे. उर्वरित प्रकल्पांची कामे प्रगती पथावर आहेत.

(२) सिडको महामंडळावर सुमारे ११३१ कोटी रुपयांचे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत गृहनिर्माण योजनेसाठी कर्ज आहे हे खरे आहे. तथापि यामुळे सिडकोची आर्थिक परिस्थिती कुमकुवत नाही. नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प सरकारी / खाजगी तत्वावर उभारण्यात येत असून विकासकामार्फत प्रकल्पामध्ये गुंतवणूक करण्यात येत आहे. सिडकोच्या आर्थिक परिस्थितीसाठी सिडकोकडे उपलब्ध अतिरिक्त जमिनीची विक्री करून निधी उभा केला जात आहे. त्यासोबत प्रधान मंत्री गृह निर्माण योजनेतील घरांची विक्री करून निधी उभारला जात आहे. सदर उभारलेल्या निधीमधुन विविध पायाभूत सोयी सुविधा निर्मिती हाती घेण्यात येत आहे.

(३) त्यापैकी नवी मुंबई मेट्रो मार्ग १ हा प्रकल्प पूर्ण होऊन कार्यान्वित झालेला आहे. सिडको गृहनिर्माण योजनेअंतर्गत २५७२३ घरांची सिडकोने लॉटरी काढून त्यापैकी १५१८२ घरांची वाटप करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येत आहे. उर्वरित प्रकल्पांची कामे प्रगती पथावर आहेत. नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प सरकारी/खाजगी तत्वावर

उभारण्यात येत असून विकासकामार्फत प्रकल्पामध्ये गुंतवणूक करण्यात येत आहे. सद्यस्थितीत जानेवारी २०२५ पर्यंत प्रकल्पाने ८४.३०% भौतिक प्रगती केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

## पुणे शहर व जिल्ह्यात रेशन दुकानात धान्य वस्तुंचा तुटवडा होत असल्याबाबत

**(४२) ४५७४ (२८-०४-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर व जिल्ह्यात रेशन दुकानात विविध धान्य वस्तुंचा तुटवडा होत असून रेशन धान्याची उचल करणाऱ्या ठेकेदारांनी धान्य उचलण्यात अक्षम्य दिरंगाई केल्यामुळे माहे ऑगस्ट, २०२४ ते जानेवारी, २०२५ या कालावधीत जिल्हा व शहरात फक्त ५० टक्केच धान्य नागरिकांपर्यंत पोहचल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत ३६८० टन कोटा असताना फक्त ७८१ टन धान्य उचलण्यात येणे तसेच अंत्योदय योजनेंतर्गत १२९ टन कोटा असताना धान्य उचलण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहर व जिल्ह्याकरिता धान्य उचलण्यासाठी नेमलेल्या कंत्राटदारांकडून होत असलेल्या दिरंगाईमुळे अन्य धान्य वितरण व जिल्हा प्रमुख अधिकाऱ्यांनी कंत्राटदारांना अनेक वेळा लेखी नोटीसा देवूनही कंत्राटदारांच्या वर्तवणूकीत सुधारणा होत नसल्याचे उघडकीस आल्यानंतर कंत्राटदारांवर योग्य ती कारवाई करावी असा प्रस्ताव या दोन्ही अधिकाऱ्यांनी राज्य शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त दोन्ही अधिकाऱ्यांच्या कार्यकक्षेत असलेल्या अधिकारामधून संबंधित कंत्राटदारांना ७ लाख रुपयांचा दंड ठोठविण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधित कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०७-०७-२०२५) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) अन्नधान्य उचलीमध्ये दिरंगाई झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे तसेच अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांनी सदर वाहतूक कंत्राटदारास वेळोवेळी कारणे दाखवा नोटीस बजावल्या आहेत.
तसेच प्रस्तुत प्रकरणी लेखी नोटीस देऊनही कामकाजात सुधारणा न झाल्याने मे.सिल्व्हर रोडलाईन्स यांच्यावर पुढील उचीत कार्यवाही करण्याचा प्रस्ताव जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे यांनी शासनास सादर केला होता.
(४) जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे यांनी सदर वाहतूक कंत्राटदारास रू.७,८२,१२०/- इतक्या रकमेचा दंड ठोठावला असून सदर रकमेची वसुली वाहतूकदाराच्या देयकांमधून करण्याचा प्रस्ताव वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालयास सादर केला आहे.
(५) जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे यांनी शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधित वाहतूकदारावर दंडात्मक कारवाई केलेली आहे.
त्याचप्रमाणे जिल्हा पुरवठा अधिकारी, पुणे आणि अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांनी वेळवेळी बजावलेल्या कारणे दाखवा नोटीसांच्या अनुषंगाने शासनस्तरावरून देखील मे.सिल्व्हर रोडलाईन्स यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. सदर नोटीसीचा खुलासा प्राप्त झाला असून त्यानुषंगाने कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

## माथेरान (ता. कर्जत जि. रायगड) येथील हात रिक्षाचालकांना पर्यावरण पुरक ई-रिक्षा उपलब्ध करण्याबाबत

**(४३) ४७३१ (०१-०५-२०२५). श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (ता. कर्जत जि. रायगड) येथील नागरिकांना नोकरी मिळत नसल्याने कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी बैल जशी गाडी ओढतात तशीच यांना हातगाडी ओढावी लागत असुन, शासनाने या हातरिक्षाचालकांना ई-रिक्षा देऊन या कष्टातून यांची सुटका करावी अशी मागणी माथेरान मधील हात रिक्षाचालकांनी दिनांक २१ जानेवारी, २०२५ वा त्यासुमारास केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माथेरानमधील या ई-रिक्षासंदर्भात सर्व प्रकारची पायलट प्रोजेक्टची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होऊन सर्वोच्च न्यायालयाने निर्देश देऊनही हात रिक्षाचालकाना ई-रिक्षा अद्यापर्यंत मिळाल्या नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गावात एक पर्यायी व्यवस्था म्हणून ई-रिक्षा सुरु व्हावी यासाठी हातरिक्षा संघटनांनी संघर्ष केल्यानंतर ९४ परवाना असणाऱ्या हातरिक्षांच्या जागी केवळ २० पर्यावरणपूरक ई-रिक्षा देण्यात आल्या परंतु अद्याप ७४ हातरिक्षाचालकांना अद्यापही ई-रिक्षा मिळालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी हातरिक्षाचालकांना ई-रिक्षा देऊन त्यांची कष्टातून मुक्तता करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०७-२०२५) :** (१) अशा आशयाची मागणी श्रमिक रिक्षा चालक-मालक सेवा संस्था, माथेरान यांनी जिल्हाधिकारी, रायगड तथा सदस्य सचिव, माथेरान सनियंत्रण समिती यांचेकडे केल्याचे दिसून येते.

(२) व (३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २२/५/२०२२ रोजीच्या आदेशानुसार माथेरान नगरपरिषद हद्दीत ३ महिन्यांसाठी प्रायोगिक तत्वावर ७ ई-रिक्षा चालविण्यास मान्यता देण्यात आली होती. तद्नंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २२/११/२०२३ रोजीच्या आदेशानुसार प्रायोगिक प्रकल्प जसा होता तशाच स्वरुपात पुढे सुरु ठेवण्याचे निर्देश दिले. आता, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १५/०४/२०२४ रोजीच्या आदेशानुसार ई-रिक्षांची संख्या २० इतकी केली असून दिनांक १०/०६/ २०२४ पासून या ई-रिक्षा श्रमिक हात रिक्षा चालक मालक सेवा संस्थेतील नोंदणीकृत (परवानाधारक) हात रिक्षा चालकांकडून नगरपरिषद हद्दीत चालविण्यात येत आहेत.

(४) सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व माथेरान सनियत्रंण समितीचे निर्देशानुसार नगरपरिषदे कडून वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहरातील अन्न व नागरी पुरवठा कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी कार्यालयात वेळेवर उपस्थित राहत नसल्याबाबत

**(४४) ५१५८ (२८-०४-२०२५). श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) शहरातील अन्न व नागरी पुरवठा कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी हे कार्यालयीन वेळेत कार्यालयात वेळेवर उपस्थित राहत नसल्याने नागरीकांची मोठी गैरसोय होत असल्याच्या अनेक तक्रारी नागरीकांकडून स्थानिक प्रशासन व लोकप्रतिनिधींकडे वारंवार करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयास स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी प्रत्यक्ष भेट दिली असता अधिकारी व कर्मचारी कार्यालयात उपस्थित नसल्यामुळे कामकाजाची वेळ होऊनही कार्यालय बंद असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी अपर तहसिलदार, इचलकरंजी तसेच जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे तक्रार केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०१-०७-२०२५) :** (१) इचलकरंजी शहर पुरवठा शाखा मध्ये इचलकरंजी शहर, शहापूर या भागातील नागरीकांचे पुरवठा संबधित कामकाज होत असते. शासन निर्णय क्र. शिवाप २०२१/प्र.क्र.१९/नापु -२८ दिनांक. १६/०५/२०२३ अन्वये जूलै २०२३ पासून शिधापत्रिकाबाबतचे सर्व कामकाज संगणीकृत ऑनलाईन प्रणालीतून देण्याचे कार्यवाही सुरु आहे. सर्व्हर प्रोब्लेम व तांत्रिक अडचणीमुळे कामे विलंब लागत आहेत. प्रलंबित कामासाठी स्थानिक नागरिकांच्याकडून तक्रारी होत असतात, हे खरे आहे.
(२) होय, दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी मा. श्री. राहूल आवाडे, विधानसभा सदस्य यांनी अचानक पुरवठा कार्यालयास भेट दिली असता सकाळी १०.०० वाजेपर्यंत कार्यालय बंद होते हे खरे आहे परंतु सकाळी १०.०० नंतर सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित झाले होते.
(३) होय, हे खरे आहे.
(४) संबधित अधिकारी व कर्मचारी यांना त्याच दिवशी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. खुलासा प्राप्त झालेनंतर कार्यालयीन वेळेत हजर राहणेबाबत ज्ञापनाव्दारे आदेशीत करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही. .

---

**महाराष्ट्रात अन्य राज्यातील लॉटरी विक्रीवर बंदी आणून महाराष्ट्र राज्य लॉटरी बंद न करता सुरु ठेवण्याबाबत**

**(४५) ५२५७ (३०-०४-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यात अंध, अपंग, वृद्‌ध महिला व बेरोजगार तरुणांना रोजगार मिळण्यासाठी राज्यात गेली ५ दशके विश्वसनीय पारदर्शक सुरु असलेली महाराष्ट्र राज्य लॉटरी बंद करण्याचा निर्णय राज्य शासनाने दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्य राज्यातील लॉटऱ्यांची महाराष्ट्रात सर्रास विक्री होऊन त्याची सोडत त्यांच्याच राज्यात होऊन यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार होत असल्याने या लॉटऱ्यांवर बंदी न घालता राज्य शासनाने सन १९६९ साली सुरु केलेली महाराष्ट्र राज्य लॉटरी अचानक बंद करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त लॉटरी विक्री व्यवसायावर लाखो लोकांचा रोजगार अवलंबून असल्याने सदरहू लॉटरी बंद केल्यास मोठ्या प्रमाणात बेराजगारी होणार असल्याने त्यास पर्यायी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (०५-०६-२०२५) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नविन गृहनिर्माण धोरणामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगळे धोरण राबविण्यात येणार असल्याबाबत**

**(४६) ५५७९ (२३-०४-२०२५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने तयार करण्यात आलेल्या नविन गृहनिर्माण धोरणामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगळे धोरण राबविण्यात येणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री, यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी प्रलंबित असलेले प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्देशानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०७-२०२५) :** (१) हे खरे आहे.

या विभागाचे "राज्य गृहनिर्माण धोरण - २०२५" ला मा.मंत्रीमंडळ स्तरावरुन मान्यता मिळालेली असून सदर धोरणामध्ये ज्येष्ठ नागरीकांसाठी नवीन गृहनिर्माण धोरणाची बाब समाविष्ट करण्यात आली आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

मुंबई झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी रखडलेले / प्रलंबित प्रकल्प पुर्ण करणेबाबत या विभागाचा दिनांक २१.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये अभय योजना (Amnesty Scheme) राबविण्यास तसेच झोपडपट्टी प्राधिकरणास निविदा प्रक्रियेने विकासकाची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तसेच रखडलेल्या / प्रलंबित असलेल्या योजना संयुक्त भागीदारी तत्वावर (Joint Venture) राबविण्यास या विभागाच्या दिनांक २१.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही. .

---

**काचीपुरा चौक ते बजाजनगर चौक ते व्हीएनआयटी चौक येथे**
**वॉकेबल स्ट्रीट प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४७) ५८५० (०१-०५-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील कृपलानी चौक ते अजनी चौक दरम्यान विकसित करण्यात आलेल्या रस्त्याच्या धर्तीवर सेंट्रल बाजार रोडवरील काचीपुरा चौक ते बजाजनगर चौक ते व्हीएनआयटी चौक दरम्यान साकारण्यात येत असलेल्या 'वॉकेबल स्ट्रीट प्रकल्पा'चे काम अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याचे दिनांक ८ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामाच्या ठेकेदारास आजमितिपर्यंत दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन 'वॉकेबल स्ट्रीट प्रकल्पा'चे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) नागपूर शहरातील "Nagpur Healthy Street Programme" संकल्पनेतून वॉकेबल स्ट्रीट प्रकल्पातंर्गत काचीपुरा चौक ते बजाजनगर चौक ते व्हीएनआयटी चौक या रस्त्याच्या विकास कामाकरिता मे. सन्नी इंफ्राप्रोजक्ट, नागपूर या कंपनीस दिनांक १७.०३.२०२३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले.

काचीपुरा चौक ते बजाजनगर चौक ते व्हीएनआयटी चौकाच्या दोन्ही बाजूस काम करावयाचे असल्याने एकाचवेळेस दोन्ही बाजूच्या कामास सुरुवात केल्यास वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असल्याने व्हीएनआयटी चौक ते बजाजनगर चौका दरम्यान डाव्या बाजूस व बजाजनगर चौक ते काचीपुरा चौका दरम्यान उजव्या बाजूचे काम कंत्राटदारातर्फे सुरु करण्यात आले. तसेच व्हीएनआयटी चौक ते बजाजनगर चौका दरम्यान डाव्या बाजूस डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ, नागपूर च्या भिंती लगत असलेल्या रस्त्याचा विकास करण्यासंदर्भात डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ, नागपूर यांच्यासोबत दिनांक १४.१२.२०२३ रोजी करारनामा करुन प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली. रस्त्याचे काम पुर्ण झाल्यावर १५ दिवसांचा क्युरिंग कालावधी द्यावा लागतो. तिन्ही चौकामध्ये काम करीत असतांना चौकांमधील वाहतूक सूरळीत ठेवून काम करावे लागत असल्याने कामास विलंब होत आहे.

मार्च २०२५ अखेर एकूण कामांपैकी ६५% कामे पूर्ण झालेली असून आतापर्यंत कंत्राटदारास एकूण २ वेळा मुदतवाढ देण्यात आलेली आहे. पहिली मुदतवाढ दिनांक १६.०९.२०२४ रोजी विनादंड देण्यात आलेली असून दुसरी मुदतवाढ दिनांक १६.०३.२०२५ रोजी रु.५,०००/- प्रतिदिन दंडासह देण्यात आली आहे व सदर दंडात्मक रक्कम कंत्राटदाराच्या देयकांमधून वसूल करण्यात येत आहे.

---

## कोल्हापूर जिल्ह्यात छत्रपती शाहू महाराजांची आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याबाबत

**(४८) ५९५८ (२३-०४-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात छत्रपती शाहू महाराजांची आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याबाबत निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांना नुकतेच दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने स्मारक उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०७-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) कोल्हापूर येथील वस्त्रोद्योग महामंडळाच्या बंद झालेल्या गिरणीच्या जागेवर राजर्षी शाहू महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी सदर जागा कोल्हापूर महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याकरीता प्रस्तावित स्मारकाचा आराखडा वस्त्रोद्योग विभागास सादर करण्याचे निर्देश मा.मुख्य सचिव महोदयांनी दिनांक ११/०३/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये दिले आहेत. त्यानुसार कोल्हापूर महानगरपालिकेने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेमार्फत प्रस्तावित स्मारकाचा सविस्तर आराखडा सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागास दिनांक १५/१०/२०२४ रोजी सादर केला आहे. शाहू मिलची जागा कोल्हापूर महानगरपालिकेस हस्तांतरीत झाल्यानंतर स्मारक उभारण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात गाई व म्हशींना दूध वाढीसाठी इंजेक्शन देत असल्याबाबत

**(४९) ६०७२ (२८-०४-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गाई व म्हशींच्या दुध वाढीसाठी त्यांना इंजेक्शन देण्याचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाने यावर्षी केवळ दोनच ठिकाणी छापा टाकून कारवाई केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गाई व म्हशींना इंजेक्शन देऊन दूध काढण्यात येत असल्याने कृत्रिम दुधामुळे नागरिकांच्या आरोग्यावर

त्याचा परिणाम होत असून याची तपासणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ (०२-०७-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

गाई व म्हशीना दूध वाढीसाठी लागणा-या ऑक्सीटोसीन इंजेक्शनची पुणे जिल्ह्यात एक व ठाणे जिल्ह्यात चार अशी एकूण पाच प्रकरणे निदर्शनास आली आहेत.
(३) व (४) अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ०१.०४.२०२४ ते दिनांक २८.०२.२०२५ या कालावधीत एकूण पाच प्रकरणांत पोलिसांसमवेत कारवाई घेण्यात येऊन एकूण नऊ व्यक्तीना अटक करण्यात आली आहे. सदर सर्व प्रकरणांत संबधितांविरूद्व प्रथम खबर अहवाल नोंदविण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्याच्या नव्या गृहनिर्माण धोरणाला राज्यमंत्रीमंडळाने मान्यता दिल्याबाबत**

**(५०) १११०८ (२९-०६-२०२५). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या नव्या गृहनिर्माण धोरणाला राज्यमंत्रीमंडळाने दिनांक २० मे, २०२५ रोजी वा त्या सुमारास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गृहनिर्माण धोरणामध्ये प्रामुख्याने कोण-कोणत्या बाबींचा समावेश आहे,
(३) असल्यास, गृहनिर्माण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कोणती व्यवस्था करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०७-२०२५) :** (१) होय

या विभागाच्या माझे घर, माझा अधिकार हे ब्रीद अनुसरुन राज्यातील प्रत्येक नागरिकाला परवडणारी, सर्वसमावेक्षक, शाश्वत आणि पुनर्निर्माणशील या मुलभूत तत्वांचे आधारित घरे उपलब्ध करुन देण्याचे अभिवचन देणारे “राज्य गृहनिर्माण धोरण - २०२५” ला दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या मा.मंत्रीमंडळच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.
(२) व (३) सदर राज्य गृहनिर्माण धोरणामध्ये डाटा आधारित निर्णय प्रक्रिया, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, गतिमानता व पारदर्शकता आणि सामाजिक समावेशकता यावर भर देण्यात आला आहे. सदर राज्य गृहनिर्माण धोरणामध्ये “ प्रामुख्याने - गृहनिर्माण धोरणाची ४ मुलतत्वे , राज्यात २०३० पर्यंत ३५ लाख घरांचे उद्दिष्टे, राज्य गृहनिर्माण माहिती पोर्टल ( स्टेट हाऊसिंग इन्फार्मेशन पोर्टल) (SHIP), निवासी वापरासाठी योग्य असलेल्या शासकीय जमिनींची भूमी अधिकोष (Land Bank) आधारसामग्रीची निर्मिती, राज्यस्तरीय सर्वोच्च तक्रार निवारण समिती (AGRC), महाआवास निधी, झोपडपट्ट्यांसाठी Cluster पुनर्विकासाला प्रोत्साहन, झोपडपट्टी पुनर्वसनासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधीचा (CSR) वापर, धोकादायक इमारतींचा पुनर्विकास इत्यादी बाबींचा समावेश आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.